वसुली अधिकारी-१ यांचे कार्यालय, ऋण वसुली अधिकरण औरंगाबाद

"जीवन सुमन", एल.आय.सी.बिल्डींग, प्लॉट नं.३, एन-५, सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३.
फोन : (0240) 2473612, फॅक्स : (0240) 2473613, E-Mail : drtaurangabad-dfs@nic.in

Form No.22 [See Regulation 37(1)]

रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यु टू बँक अँण्ड फायनान्शीयल इन्स्टीट्युशन अॅक्ट, १९९३ सह वाचल्या जाणाऱ्या
आयकर कायदा १९६१ मधील दुसऱ्या परिशिष्टामधील नियम ३८, ५२(२) तहत विक्रीचा जाहीरनामा

आर.पी. नं. : ०२/२०२१

नि.क्र. २७-ए
दिनांक : १२/०२/२०२६

ई-ऑक्शन द्वारे विक्रीची सूचना

लिलावाची तारीख व वेळ : दिनांक ०९/०४/२०२६ रोजी दुपारी ०२.०० ते ०३.०० च्या दरम्यान

अनामत रक्कम भरण्याची अंतिम तारीख व वेळ : दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजे पर्यंत

बँक ऑफ बडोदा विरूद्ध मे. सच्चीदानंद केटरर्स

प्रति,

(सीडी-१) मे. सच्चीदानंद केटरर्स, मार्फत त्यांचे प्रोप्रायटर **प्रकाश सच्चीदानंद कुलकर्णी,**
राहणार : फ्लॅट क्र.बी-१, अष्टभुजा अपार्टमेंट, भक्ताची देवी मंदीर जवळ, स्वामी विवेकानंद चौक, गुजर गल्ली, अहमदनगर.

ज्याअर्थी, OA/४८७/२०२० मध्ये दिनांक ०७/१२/२०२१ रोजी जारी केलेले **वसुली प्रमाणपत्र क्र. RC/०२/२०२१** या मधील अर्जदार बँक/वित्तीय संस्था यांना देय असलेली एकूण रक्कम रूपये **३७,३९,६७०.०० (रू.सदोतीस लाख एकोणचाळीस हजार सहाशे सत्तर केवळ)** अधिक त्यावरील दिनांक १७/०६/२०२० पासूनचे **द.सा.द.शे. १०.००%** दराने पुढील साधारण व्याज **व दंड रक्कम रू.४०,०००/- (रू. चाळीस हजार केवळ)** असे एकूण रक्कम प्रमाणित धनको बँक यांना देण्यास आपण प्रतिवादी असमर्थ ठरलेले आहात. **आणि ज्याअर्थी**, खालील सही करणार यांनी सदरील प्रमाणपत्राच्या समाधानासाठी प्रमाणित ऋणकोच्या खालील परिशिष्टातील नमूद गहाण/जप्त मालमत्ता विक्रीचे आदेश दिले आहेत. आणि ज्याअर्थी **दिनाक १२/०२/२०२६** पर्यंतची दंड व व्याजासहीत एकूण देय रक्कम **रू.६०,४६,४२६/-.**

कोणत्याही पुढे ढकलण्याच्या आदेशाच्या गैरहजेरीत, सूचीत करण्यात येते की, सदरील मिळकत ही **ई-ऑक्शन द्वारे दिनांक ०९/०४/२०२६ रोजी** दुपारी २.०० ते ३.०० दरम्यान (आवश्यक असल्यास बंद करण्यापुर्वी शेवटच्या ५ मिनीटास बोलीच्या स्वयंचलीत वेळवाढ या नियमासह), ई-ऑक्शन विक्री **बँकनेट यांची** वेबसाईट : **https://baanknet.com** यावर **ऑन लाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग द्वारे** विकण्यात येईल. **संपर्क क्र.+९१ ८२९१२२०२२०**, ई-मेल : **support.baanknet@psballiance.com support.baanknet@procure247.com**

इच्छुक बोलीदारांनी उपरोक्त नमुद ई-ऑक्शन एजन्सी कडे बऱ्यापैकी आधी स्वत:ची नोंदणी करून जाहीर लिलावासाठी लागणारे दस्तावेज अपलोड करण्यासाठी युजर आयडी आणि पासवर्ड घ्यावा. अनामत (EMD) रक्कम भरल्यानंतर इच्छुक बोलीदार हे **बँकनेट** यांचेकडून ई-ऑक्शनसाठी आनलाईन प्रशिक्षण घेऊ शकता.

अधिक माहितीसाठी संपर्क : श्री.पी.के.श्रीवास्तव, मुख्य प्रबंधक, बँक ऑफ बडोदा, तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा, औरंगाबाद, **संपर्क क्र. ९००५१७८०७०,** ई-मेल : **saraur@bankofbaroda.co.in**

अनामत रक्कम (EMD), **राखीव किंमत आणि बोली वाढ रक्कम ही खालील प्रमाणे निश्चित केलेली आहे.**

लॉट क्र.	विक्रीस असलेल्या मालमत्तेचा तपशील	अनामत रक्कम (रू.)	राखीव किंमत (रू.)	बोलीवाढ रक्कम (रू.)
१	**प्रतिवादी क्र.१ यांचे मालकीचा मौजे सावेडी, ता.नगर, जि.अहमदनगर येथील गट क्र.३२१/१, उज्वल हाऊसिंग सोसायटी मधील प्लॉट क्र.३ वर बांधण्यात आलेला सर्व भाग व पोटभाग हिस्यांसहीत बंगलो क्र.३, क्षेत्रफळ ३००० चौ.फु. मधील अविभाजीत चौथा हिस्सा.**	२,००,०००/-	२०,००,०००/-	५०,०००/-

अटी व शर्ती :

(१) अनामत रक्कम ही **'Recovery Officer, DRT, Aurangabad in R.C. No. 02/2021'** यांचे नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँक/शेड्युल्ड बँकेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर द्वारे भरणा करावी. स्वत: प्रमाणित केलेले ओळखपत्र (ईलेक्शन कार्ड/ड्रायव्हींग लायसेन्स/पासपोर्ट) ज्यामध्ये भविष्यातील संवादासाठी पत्ता असावा यासहीत सदरील डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर द्वारे अनामत रक्कम, स्वत: प्रमाणित केलेले पॅन कार्ड, आणि जर कंपनी असेल तर कंपनीचा ठराव किंवा असे एखादे दस्त ज्यामध्ये आपण अधिकृत प्रतिनिधी/वकील असल्याचे प्रमाणित होईल **हे सर्व दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत वसुली अधिकारी, ऋण वसुली अधिकरण, औरंगाबाद** यांचे कार्यालयात पोहचल्या पाहिजेत. वैयक्तिक बाबतीत, बोली त्याच्या/तिच्या वतीने किंवा त्याच्या/तिच्या तत्वाच्या वतीने असेल तर एक घोषणापत्र दाखल करावे. नंतरच्या प्रकरणात, बोलीकर्त्याने त्याचे अधिकार देणे आवश्यक असेल आणि चुक झाल्यास , त्याची/तिची बोली नाकारली जाईल. त्यानंतर आलेली अनामत रक्कम किंवा अनामत रक्कम भरल्याचा मुळ पुरावा हा विचारात घेतला जाणार नाही. **(२) अनामत** रक्कम किंवा अनामत रक्कम NEFT/RTGS द्वारे भरल्याचा मुळ पुरावा हे सर्व ज्या लिफाफ्यामधे असेल त्या बंद लिफाफ्यावर **"RC No.02/2021"**, पाठवणाऱ्याचा तपशिल जसे की, संपूर्ण पत्ता, ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक इत्यादी ठळक अक्षरात लिहावे. **(३)** मालमत्तेची विक्री ही **'जशी आहे जेथे आहे तशी'** तत्वावर आणि **'जी काय आहे आहे तशी'** या तत्वावर केली जाईल. **(४)** मालमत्तेची **प्रत्यक्ष पाहणी दि. २३/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० च्या दरम्यान** करता येऊ शकेल. **(५)** सर्वोत्तम बोलीदारास लिलावातील मालमत्तेचा यशस्वी खरेदीदार घोषित करण्यात येईल. प्रस्तावित किंमत ही सरळ-सरळ अपुरी आहे असे दिसून येईल व तसे करण्यास योग्य आहे असे वाटेल तेंव्हा सर्वोत्तम बोली नाकारण्याचा/स्विकारण्याचा संपुर्ण अधिकार खालील सही करणार यांचा राहील. **(६)** अयशस्वी बोलदारांनी त्यांची अनामत रक्कम सरळ वसुली अधिकारी, ऋण वसुली अधिकरण यांचे कार्यालयातुन घ्यावी. **(७)** एकदा का बोली दाखल केली की, बोलीदारास ई-ऑक्शन एजन्सीच्या पोर्टलवर जाऊन ई-ऑक्शनच्या बोली प्रक्रियेत लॉगइन करणे आवश्यक आहे, यात कसूर केल्यास व खालील सही करणार यांना योग्य वाटल्यास अनमात रक्कम शासनाकडे जप्त करण्यात येईल. **(८) यशस्वी खरेदीदार**/उच्चतम बोलीदारास अनामत रक्कम समायोजित करून त्याच्या अंतिम बोली रकमेच्या २५% रक्कम बँकेच्या कामकाजाचे दुसऱ्या दिवशी **'Recovery Officer, DRT, Aurangabad in R.C. No.02/2021'** यांचे नावाने डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर द्वारे भरणा करावी किंवा **Recovery Officer, DRT, Aurangabad** यांचे नावाने **बँक ऑफ बडोदा**, शाखा सिडको, औरंगाबाद येथील खाते क्र. **42910200000079** आणि **IFSC Code: BARB0CIDAUR** मध्ये सरळ भरणा करावे. **(९) यशस्वी खरेदीदार**/उच्चतम बोलीदारास **Recovery Officer, DRT, Aurangabad** यांचे समोर उर्वरित ७५% रक्कम विक्रीच्या तारखेनंतर १५ दिवसाचे आत भरणा करावा लागेल. जर १५व्या दिवशी रविवार किंवा सुट्टीचा दिवस आल्यास १५व्या दिवसानंतर आलेल्या पहिल्या कामकाजाचे दिवशी उपरोक्त परिच्छेद क्र.८ मधे नमूद केलेल्या खात्यामध्ये ठराविक पद्धतीने रक्कम भरणा करावी लागेल. वर नमूद केल्या व्यतिरिक्त खरेदीदारास रू.१;०००/-पर्यत २% व व रू.१,०००/- पुढील रकमेवर १% या प्रमाणे येणाऱ्या रकमेचा **पाउंडेज फि** म्हणून "Registrar, Debts Recovery Tribunal, Aurangabad" यांचे नावे काढलेला डिडि **वसुली अधिकारी, डिआरटी, औरंगाबाद** यांचे कार्यालयात देय राहील. (उर्वरित ७५% रक्कम पोस्टाद्वारे पाठवण्याच्या प्रकरणात देखील उपरोक्त नमुदप्रमाणे वसुली अधिकारी यांचेकडे पोहचल्या पाहिजेत). **ठराविक कालावधीमधे** रक्कम जमा करण्यास असमर्थ ठरल्यास, नवीन विक्रीचा जाहीरनामा जारी करून, मालमत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. आणि खालील सही करणार यांना योग्य वाटल्यास, जमा ठेव रक्कम ही जप्त करून विक्रीसाठी येणारा खर्च वजा करून सरकार जमा केली जाईल, आणि कर्तव्यात चुक करणाऱ्या बोलीदाराचे मिळकतीसंदर्भातील किंवा जेवढा भाग विक्रीसाठी ठेवण्यात आला होता त्यापुरत्या सर्व मागण्या/दावे जप्त करण्यात येतील. **(१०) वसुली अधिकारी**, ऋण वसुली अधिकरण, औरंगाबाद यांनी मालमत्तेची विक्री निश्चित करे पर्यंत उच्च्यतम बोली धारकारचे मालमत्तेवर कोणतेही हक्क/अधिकार प्रस्थापित होणार नाही. **(११) कोणताही** अधिकारी किंवा इतर व्यक्ती, ज्याला विक्रीच्या संबंधात कोणतेही कर्तव्य बजावणे नाही, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विकल्या गेलेल्या मालमत्तेमध्ये कोणतेही स्वारस्य मिळवण्यासाठी किंवा संपादन करण्यासाठी बोली लावली नाही. विक्री आयकर उपक्रम, १९६१ च्या द्वितीय अनुसूचीमध्ये विहीत केलेल्या अटीच्या अधीन असेल आणि तेथे केलेल्या नियमानुसार आणि पुढील अटींच्या अधीन असेल. **(१२) जोडलेल्या** पत्रकात नमुद केलेला तपशिल हा खाली सही कराणार यांचे उच्च ज्ञात माहितीवर आधारित आहे, परंतु घोषणापत्रात चुक, चुकीची माहिती किंवा वगळल्या गेले असेल तर त्यास खालील सही करणार हे उत्तरदायी राहणार नाही. **(१३) जर अवाजवी** वाटल्यास, कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा किंवा स्विकारण्याचा, किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही क्षणी लिलाव पुढे ढकलण्याचा पुर्ण अधिकार खालील सही करणार यांना राहील आणि त्यांचा निर्णय हा अंतिम राहील.

लॉट क्र.	विक्रीस असलेल्या मालमत्तेचा तपशील	मालमत्तेवरील वा त्यावरील भागावरील महसुल कर	मालमत्तेवरील ज्ञात बोजाचा तपशील	मागणी जर काही असेल तसे, जी की मालमत्तेवर आहे आणि अन्य माहित तपशिल त्याचे मुल्य व प्रकार
१	**प्रतिवादी क्र.१ यांचे मालकीचा मौजे सावेडी, ता.नगर, जि.अहमदनगर येथील गट क्र.३२१/१, उज्वल हाऊसिंग सोसायटी मधील प्लॉट क्र.३ वर बांधण्यात आलेला सर्व भाग व पोटभाग हिस्यांसहीत बंगलो क्र.३, क्षेत्रफळ ३००० चौ.फु. मधील अविभाजीत चौथा हिस्सा.**	माहित नाही	माहित नाही	माहित नाही

सदरहू नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी औरंगाबाद येथे जारी केली आहे.

(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.)

सही/- (शरद बावीस्कर)
वसुली अधिकारी-१
ऋण वसुली अधिकरण, औरंगाबाद.